**FEDERAL MOGUL POWERTRAIN AND ANAND GROUP ENTER INTO A JOINT VENTURE**
**MARCH 11, 2015**
**KESARI**

# ‘फेडरल-मोगल पॉवरट्रेन’ आणि ‘आनंद ग्रुप’तर्फे दोन नव्या कंपन्या स्थापन



**पुणे :** ‘फेडरल-मोगल होल्डिंग्ज कॉर्पोरेशन’चा भाग असलेली ‘फेडरल-मोगल पॉवरट्रेन’ आणि ‘आनंद इंडिया’ या कंपन्यांनी संयुक्त सहकार्याचा करार केला आहे. त्यानुसार ‘आनंद’ समूहाच्या सीलिंग व पिस्टन रिंग व्यवसायाचे रूपांतर दोन स्वतंत्र कंपन्यात करण्यात आले आहे. या कंपन्या यापुढे ‘फेडरल-मोगल सीलिंग इंडिया लिमिटेड व ‘आनंद आयपॉवर लिमिटेड’ या नावांनी ओळखल्या जातील.

सन१९७८ मध्ये या कंपन्यांनी सहयोगाने हिमाचल प्रदेशातील परवानू येथे इंजिन बेअरिंग्ज उत्पादन प्रकल्प सुरू केला आणि सन २००८ पासून तो फेडरल-मोगल बेअरिंग इंडिया लिमिटेड नावाने ओळखला जाऊ लागला. ‘फेडरल-मोगल’चे अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन व विकास क्षमता, जागतिक ग्राहक संपर्क व प्रगत उत्पादन प्रक्रिया याचां समन्वय ‘आनंद ग्रुप’चा स्थानिक ग्राहक व पुरवठादारांशी दृढ संपर्क, तसेच मानव संसाधन व्यवस्थापन व विकास या गुणांशी घडून येत असल्याने या नव्या कंपन्यांचे भवितव्य उज्ज्वल ठरेल.